ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख १३ फेब्रुवारी, १९५७ • अंक ७

## विविध माहिती

**टाटा कंपनीची देणगी—** मुंबई विद्यापीठाच्या शतसांवत्सरिक समारंभाच्या वेळीं टाटा पोलादाच्या कंपनीनें विद्यापीठाला ३०,००० रुपयांची देणगी जाहीर केली. विद्यापीठानें आखलेल्या विस्तासच्या कार्यक्रमासाठी ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. गेल्या वर्षी कंपनीनें अशीच देणगी कलकत्ता विद्यापीठाला दिली होती.

**सरकारी नोकरांना किमान वेतन—**भारतीय सरकारच्या व राज्य सरकारांच्या कमी वेतन मिळणाऱ्या नोकरांना किमान वेतन देण्याचें तत्त्व भारतीय सरकारनें मान्य केलें आहे. अर्थमंत्री श्री. कृष्णाम्माचारी ह्यांनीं असा हिशेब केला आहे कीं राज्य सरकारांच्या ज्या नोकरांना दरमहा १०० रुपयांपेक्षा कमी पगार मिळतो त्यांना १२ रुपये वाढवावयाचे झाल्यास ३२ कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल.

**रेल्वेच्या नोकरांना वैद्यकीय मदत—** भारतीय रेल्वेवर काम करणाऱ्या नोकरांना अधिक वैद्यकीय मदत देण्याच्या योजना रेल्वेबोर्डानें आखल्या आहेत. ज्या ज्या ठिकाणीं रेल्वेचीं इस्पितळें असतील त्या त्या ठिकाणीं छाती तपासण्याचें केंद्रहि उघडण्यांत येणार आहे. ज्या कामगारांना क्षयाची बाधा असेल त्यांच्यासाठी ही व्यवस्था करण्यांत येत आहे.

**इजिप्तमध्यें सोन्याच्या खाणी—** इजिप्तच्या पूर्व भागांत सोन्याच्या खाणी सांपडल्याची वार्ता आहे. खाणी वालुकामय भागांत असून त्यामधून निघूं शकणाऱ्या सोन्याचा उपयोग करून इजिप्तला आस्वान धरण बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च भागवितां येईल, असें म्हणतात. आस्वानच्या धरणासाठी सुमारें ४६ कोटी पौंड खर्च येईल.

**पोलिसांची रहाण्याची व्यवस्था—**हैदराबाद शहरांतील पोलिसांची रहाण्याची सोय करण्यासाठी आंध्र राज्य सरकारनें नवीन गाळे बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ६ कोटी रुपये लागतील. सध्यां हैद्राबाद शहरांतील पोलिसांची संख्या सुमारें ५,००० आहे. पण फक्त ५०० जणांचीच राहण्याची सोय आहे.

**सुएझ कालव्याची साफसुफाई—** सुएझ कालव्यांतील अडथळे काढून तो वाहतुकीस योग्य करण्याचें काम डिसेंबर १९५६ अखेर सुरू झालें होतें. कालव्यांत बुडालेल्या बोटी व इतर अडथळे मिळून ४४ अडथळे होते. त्यांपैकी निम्म्याचे वर अडथळे दूर झाले आहेत. १०,००० टनी बोटी मार्चच्या सुरवातीस कालव्यांतून जाऊं शकतील.

**संयुक्त बोट कंपनी—** पाकिस्तानच्या सरकारनें इराण व इराकच्या सहकार्यानें संयुक्त मालकीची एक बोट-वाहतुकीची कंपनी काढण्याची सूचना केली होती. इराकची मान्यता आलेली आहे. अजून इराणकडून उत्तर आलें नाहीं. कंपनीचें भांडवल शक्य तर खाजगी रीत्या उभारण्याचा सर्व सरकारांचा बेत आहे.

**नवीन प्रकारच्या रेल्वे वॅगन्स—** उंचावर असणाऱ्या विजेच्या यंत्रांची तपासणी करण्यासाठी उपयुक्त अशा प्रकारच्या ६ नवीन वॅगन्स भारतीय रेल्वे बोर्डानें ब्रिटनमधील एका कारखान्याकडून मागविल्या आहेत. वॅगन्सवर एक मनोरा बसविलेला असतो. ह्या सर्व वॅगन्ससाठी सुमारें २६,००० पौंड द्यावे लागतील.

**ब्रिटनकडून विमानें घेणार—**भारतानें इंग्लिश इलेक्ट्रिक कंपनीकडून 'कॅनबेरा' जातीचीं ६० बॉबफेकी विमानें विकत घ्यावयाचें ठरविलें आहे. सर्व विमानांची मिळून किंमत २ कोटी पौंड होईल. त्यांपैकीं कांहीं विमानें चालू वर्षी भारताला मिळतील. कांहीं विमानें भारतीय वैमानिकच घेऊन येतील. त्यांना शिक्षण देण्याचें काम चालूं आहे.

**आंध्र राज्यांत लोखंडाच्या खाणी—**भारतीय सरकारच्या भूगर्भविषयक तज्ज्ञांनीं केलेल्या पहाणीप्रमाणें आंध्र राज्यांत लोखंडाच्या मातीचे दोन मोठे साठे आढळून आले आहेत. ह्या खाणी गुंतूर व वेलोर जिल्ह्यांत सांपडल्या असून त्यामधील सांठा कित्येक शतकें पुरेल इतका मोठा आहे. आणखीहि कांहीं ठिकाणीं लोखंडाच्या खाणी सांपडण्याचा संभव आहे.

**इजिप्तला झेकोस्लोव्हाकिआची मदत—**इजिप्तच्या पंचवार्षिक योजनेला मदत म्हणून झेकोस्लोव्हाकिआ औद्योगिक यंत्रसामुग्री आणि तज्ज्ञ ह्यांची पाठवणी करण्यास तयार आहे. इजिप्तला एंजिनिअरिंग, कापड व रासायनिक उद्योगधंद्यांचें यंत्रसाहित्य पाहिजे आहे. ह्या मालाच्या बदला इजिप्त कापूस देणार आहे.

**भाक्रा येथील धरणाची विशालता—**भाक्रा येथें बांधण्यांत येत असलेलें धरण जगांतील इतर कोठल्याहि धरणापेक्षा मोठें व बांधण्यास कठीण आहे, असा अभिप्राय त्यावरील मुख्य अमेरिकन एंजिनिअर मि. स्लोकम ह्यांनीं व्यक्त केला आहे. १९५५ च्या नोव्हेंबर महिन्यापासून दर तासाला ४०० टन कॉंक्रिट धरणाच्या पायांत भरण्यांत येत आहे, अशी माहितीहि त्यांनीं सांगितली.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची प्रगति

### भागांची राहिलेली रक्कम मागवून वसूल भांडवल वाढवणार

महाराष्ट्र बँकेकडील ठेवींत १९५६ मध्यें १,२१,००,००० रुपयांची वाढ झाली. एकूण ठेवींची रक्कम आतां ६३ कोटी रुपयांवर गेली आहे. वसूल भांडवल १६ लक्ष रुपये कायम आहे. ठेवींशीं तें प्रमाणबद्ध राखण्यासाठी, संचालक मंडळानें बँकेच्या विक्री झालेल्या भागांवरील राहिलेली रक्कम मागवून भांडवल वाढविण्याविषयीं ठराव केला आहे व त्यासाठी आवश्यक ती सरकारी मंजुरी मिळविण्यांत येत आहे.

अहवालाचे वर्षीं बँकेच्या बेळगांव, औरंगाबाद, जालना, अकोला व नांदेड अशा पांच ठिकाणीं नवीन शाखा उघडण्यांत आल्या.

बँकेची गेल्या वर्षांतील प्रगति

| | १९५५ अखेर | १९५६ अखेर |
|---|---|---|
| भांडवल व देणें | रु. | रु. |
| वसूल भांडवल | १६,००,००० | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७,७५,००० | १०,००,००० |
| ठेवी व इतर खातीं | ५,०६,३१,४७७ | ६,२६,०८,१९५ |
| नफा | ३,४५,७९५ | ४,०१,१६९ |
| जिंदगी व येणें | | |
| कॅश | ५७,७५,५७८ | ६९,७९,४०९ |
| मनी ( कॉल व शॉर्ट नोटीस ) | नाहीं | ३५,००,००० |
| इन्व्हेस्टमेंट्स | २,३८,४३,६५७ | २,५६,९९,४९३ |
| ॲडव्हान्सेस ( कॅशक्रेडिटस व ओव्हरड्राफ्टस ) | २,३१,७७,०५३ | २,९१,५५,९१० |

---

## किर्लोस्कर बंधु लि.

### डिव्हिडंड वाढले; बोनस शेअर्स वाटणार

किर्लोस्कर बंधु लि. ला ३१ जुलै १९५६ अखेर संपलेल्या वर्षीं ३·२१ लक्ष रु. नफा झाला. ३·६ लक्ष रुपयांची करासाठी तरतूद करून, ४·८ लक्ष रुपयांचा घसारा काढून व १·२८ लक्ष रु. मॅ. एजंटांचें कमिशन बाजूस राखून हा नफा राहिलेला आहे. डिव्हिडंडचा दर ५% चा ६% होईल व १·७५ लक्ष रुपये जनरल रिझर्व्हकडे वर्ग करण्यांत येतील. कंपनीच्या व्यवहारांतील सुधारणा आणि आणखी सुधारणेची अपेक्षा, याचें हें प्रतिबिंब आहे.

कंपनीच्या कांहीं गंगाजळीचा विनियोग बोनस शेअर्स देण्याकडे करावा अशी डायरेक्टरांची सूचना आहे. त्यासाठी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज्ची परवानगी घेण्यांत येईल. जनरल रिझर्व्हमधून ७·५७ लक्ष रुपयांचें भांडवलांत रूपांतर करून त्यांतून प्रत्येकी २५ रुपयांचा असे ३०,२५३ शेअर्स भागदारांना वाटले जातील; प्रत्येक तीन शेअर्सना एक बोनस शेअर वाटणीस येईल. १९५१–५२ मध्यें कंपनीनें दोन शेअर्सना एक या प्रमाणांत बोनस शेअर्स दिले होते. कंपनीचें वसूल भांडवल २२·९६ लक्ष रुपये असून गंगाजळींत ७२·६ लक्ष रुपये आहेत. त्यांपैकीं जनरल रिझर्व्हमध्यें ५८·३ लक्ष रुपये आहेत. भाग भांडवलाचे मानानें रिझर्व्ह कितीतरी जास्त आहत, म्हणून त्यांतील ७·५७ लक्ष रुपयांचें शेअर्समध्य रूपांतर करण्यांत येत आहे.


# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर.   ( ४ ) सांगली.

—ःव्याजाचे दरः—

चालू ठेव–अर्धा टक्का. सेव्हिंग्ज–दोन टक्के.
२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १३ फेब्रुवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वाढत्या लोकसंख्येविषयीं अर्थमंत्र्यांचा अभिप्राय

मद्रास येथें ‘ इंडिअन इन्स्टिटयूट फॉर पॉप्युलेशन स्टडीज ’ ही संस्था डॉ. एस्. चंद्रशेखरन् ह्यांच्या मार्गदर्शनाखाली उपयुक्त कार्य करीत आहे. आशिआ खंडांतील लोकसंख्येच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांविषयीं संशोधन करून ग्राह्य अशी आंकडेवार माहितीहि संस्थेकडून जमविण्यांत येत असते. संस्थेला मद्रास सरकारचा पाठिंबा असून कॅनडा व अमेरिका ह्या देशांकडूनहि कांहीं साह्य मिळत आहे. संस्थेनें आतां एका नवीन उपक्रमास प्रारंभ केला आहे. ‘पाप्युलेशन रिव्ह्यू’ नांवाचें मासिक प्रकाशित करण्यांत येणार आहे. दरवर्षी जानेवारींत एक व जूनमध्यें एक असे दोन अंक प्रथमतः प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. शक्य झालें तर नियतकालिक तिमाही करण्याचाहि चालकांचा विचार आहे.

सदर नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्याचा समारंभ भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णाम्माचारी ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. कृष्णाम्माचारी म्हणाले कीं, लोकसंख्येची वाढ समाजांतील अमुक एका थराकडून अगर अमुक एका वयाच्या गटाकडून होते असें निश्चितपणें सांगतां येण्यासारखें नाहीं. लोकांच्या रहाणीचें मान वाढविण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. पण ह्याच प्रयत्नांमुळें लोकसंख्या वाढण्याचाहि संभव आहे. शिक्षण अगर कुटुंबनियोजनाचा प्रचार ह्याच्यामुळें कदाचित् लोकसंख्येच्या फाजील वाढीला आळा बसण्याची शक्यता आहे. ही वाढ मर्यादित ठेवण्यासाठीं कांहीं एका प्रकारचीं नैतिक बंधनें घालण्यांत यावींत. अशा बंधनांना उत्तेजन देण्यांत यावें. एखाद्या कामगाराला अगर ज्याचें उत्पन्न कमी आहे अशी एखाद्या माणसाला त्याच्या कुटुंबांतील माणसांची संख्या मर्यादित ठेवण्याचें महत्त्व पटवून देणें फारसें कठीण नाहीं. ह्या लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर इतका ताण पडलेला असतो कीं, आपलें रहाणीचें मान सुधारण्याची इच्छा त्यांच्यांत तीव्र असते. भारतांत मोठें कुटुंब असणें आतां परवडणारें राहिलेलें नाहीं. संस्था ज्या प्रकारचें काम करीत आहे त्याचा फायदा घेण्यासाठी पुष्कळ लोक आपण होऊन पुढें येतील ह्यांत शंका नाहीं.

तथापि, देशापुढें असलेल्या ह्या प्रश्नाचा अभ्यास बिनचूक रीतीनें झाला पाहिजे. नियोजन समितीनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अन्नधान्याच्या उत्पादनांत ३० टक्के वाढ करण्याचें उद्दिष्ट ठेवलेलें आहे. हें उद्दिष्ट गांठलें गेलें तरी सुद्धां देशाच्या गरजेपेक्षा थोडेसेंच अधिक धान्य निर्माण होईल. कारण, ह्या काळांत लोकसंख्या झपाट्यानें वाढत जाईल आणि खेड्यांतील लोक तेथून निघून गेल्यामुळें त्यांपैकी बरींच ओस पडतील. म्हणून लोकसंख्येच्या वाढीची बरोबर कल्पना येण्यासाठीं खास अभ्यास होणें जरूरीचें आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या कारणांचा विशेष अभ्यास करून संशोधन करणारे कांहीं लोक संस्थेंत काम करूं लागतील तर तें फार चांगलें होईल. भारताच्या आर्थिक विकासाचे प्रयत्न मोठ्या प्रमाणांत करण्यांत येत आहेत. आर्थिक विकासाच्या कार्याचें मूल्यमापनहि करण्याची व्यवस्था झाली आहे. पण, ह्या कार्याचें मापन करतांना लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाच्या प्रकाशांत तें करण्यांत आलें पाहिजे. कुटुंबनियोजन व लोकसंख्या हे दोन्ही प्रश्न एकमेकांशीं निगडित असे आहेत. ते सोडविण्याच्या कामांत हें नियतकालिक महत्त्वाचा हातभार लावेल असा विश्वास अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केला.

---

## जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या हिशेबांची छाननी

### आर्थिक व्यवहारांतील सुधारणा

रिझर्व्ह बँकेनें ७५१ पब्लिक लिमिटेड कंपन्यांचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रकें ह्यांची १९५०-५४ विषयक, आणि विशेषतः १९५४ विषयक छाननी केली आहे. ह्या सर्व कंपन्या भारतांत नोंदलेल्या असून प्रत्येकीचें वसूल भांडवल किमान ५ लक्ष रु. आहे. बँका, विमा कंपन्या व इन्व्हेस्टमेंट कंपन्या वगळल्या, तर बाकीच्या सर्व पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या एकूण वसूल भांडवलाच्या दोनतृतीयांश इतक्या वसूल भांडवलाचा त्यांत समावेश आहे. त्यावरून, प्रस्तुत छाननीचें प्रातिनिधिक स्वरूप लक्षांत येईल.

### उत्पन्न आणि खर्च

विक्रीचें उत्पन्न १९५१ मध्यें १०८७ कोटी रु. होतें तें १९५३ मध्यें ९६२ कोटी रु. झालें. पण १९५४ मध्यें तें १०२६ कोटी रु. वर गेलें. उत्पादनाचा खर्चहि अनुक्रमें ७५६ कोटी रु., ५९० कोटी रु. व ६३६ कोटी रु. असा झाला. पगार व मजुरी एकसारखी वाढत गेली; १९५० मध्यें ती १५४ कोटी रु. होती ती १९५४ मध्यें १९८ कोटी रु. झाली. मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना १९५१ मध्यें १२·४ कोटी रु. होता. तो १९५३ मध्यें १०·४ कोटी रु. व १९५४ मध्यें ११·२ कोटी रु. झाला.

### नफा आणि त्याचा विनियोग

कराची तरतूद करण्यापूर्वी परंतु घसारा काढल्यावर नफा १९५१ मध्यें ८५ कोटी रु. झाला, तो १९५२ मध्यें ५५ कोटी रु. वर उतरला पण १९५३ मध्यें तो ६६ कोटी रु. व १९५४ मध्यें ७८ कोटी रु. झाला. कराची तरतूद, शिलकी नफा आणि वाटलेला नफा ह्यांतहि हीच प्रवृत्ति दिसून आली.

१९५०-५४ च्या पांच वर्षांच्या मुदतींत ७५१ कंपन्यांना मिळून एकूण ३४७ कोटी रु. नफा झाला. कराची तरतूद १४२ कोटी रु., भागदारांना नफावांटणी १३० कोटी रु. व धंद्यांतच सामावलेले ७५ कोटी रु., असा त्या नफ्याचा विनियोग करण्यांत आला.

### सरासरी ऑर्डिनरी डिव्हिडंड

१९५१ मध्यें ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंडचा सरासरी दर ८·२% होता, तो १९५२ मध्यें ७·२% वर आला; १९५३ मध्यें

तो ७·५% झाला आणि १९५४ मध्यें तो ८·२% झाला. बहुतेक प्रमुख उद्योगधंद्यांनीं १९५४ मध्यें डिव्हिडंडचा दर वाढविला आणि त्यांतहि चहाच्या मळ्यांनीं विशेष वाढ केली. लोखंड–पोलादाच्या धंद्यांत फरक पडला नाहीं. सिमेंट, कागद, ताग, वनस्पति, शिपिंग, इत्यादींनीं डिव्हिडंडचा दर उतरविला. परंतु, त्याचें कारण वाढलेलें वसूल भांडवल हें होतें; डिव्हिडंडची रक्कम कमी झाली नाहीं.

## जिंदगी व देणें

७५१ कंपन्यांची जिंदगी १९५४ मध्यें १४३२ कोटी रु. भरली; १९५० अखेर ती ११३६ कोटी रु. होती. १४३२ कोटी रु. पैकीं ७४२ कोटी रु. ची जिंदगी फिक्स्ड ॲसेट्सच्या स्वरूपाची होती. हे फिक्स्ड ॲसेट्स १९५१–५४ ह्या मुदतींत ३४% नें वाढलें. फिक्स्ड जिंदगीपैकीं तीनपंचमांश प्लँट व मशिनरी ह्यांची किंमत होती. देणें बाजूपैकीं ३८० कोटी रु. वसूल भांडवल आणि २०७ कोटी रु. रिझर्व्हज ह्यांचें होतें. बँकांकडून १०१ कोटी रु. चीं कर्जें घेतलेलीं होतीं, व्यापारी क्रेडिट ५५ कोटी रु. चें होतें, ३६ कोटी रु. चीं डिबेंचर्स होतीं आणि तारणावर २५ कोटी रु. काढलेले होते. घसारा ३५४ कोटी रु. चा काढलेला होता आणि करासाठीं तरतुद ७७ कोटी रु. ची होती. १९५० चे तत्सम आंकडे अनुक्रमें २५३ कोटी रु. व ५८ कोटी रु. असे होते.

### उत्पन्न, खर्च व नफ्याचा विनियोग
(आंकडे लक्ष रुपयांचें)

| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| **खर्च व विनियोग** | | | | | |
| १ प्रारंभींचा शिलकी माल | १०७,८५ | १२३,८२ | १५४,४४ | १५५,६२ | १५०,२८ |
| २ उत्पादनाचा खर्च | ५४६,३४ | ७५६,२८ | ७०५,३८ | ५९०,०६ | ६३६,२६ |
| ३ पगार व मजुरी | १५३,९३ | १७४,४९ | १८०,०२ | १९१,०३ | १९८,२२ |
| ४ दिलेलें व्याज | ५,८१ | ७,१७ | ८,७५ | ८,४० | ८,९५ |
| ५ मॅनेजिंग एजन्सी कमिशन | ९,८१ | १२,४२ | १०,४१ | १०,३६ | ११,१६ |
| ६ बुडीत येणीं | २८ | ४० | २५ | ३६ | २५ |
| ७ इतर खर्च | ६६,२२ | ७८,२१ | ८३,६९ | ८१,९० | ९२,३८ |
| ८ घसाऱ्याची तरतूद | २३,६८ | २७,४५ | २६,३५ | २८,०८ | २९,६१ |
| ९ कराची तरतूद | २५,०४ | ३३,३० | २४,३९ | २७,१० | ३२,५१ |
| १० रिझर्व्हजकडे वर्ग | १५,५३ | २१,३४ | १३,७९ | १४,६५ | १७,४२ |
| ११ डिव्हिडंड | | | | | |
| ऑर्डिनरी भागांवर | १९,८५ | २२,४४ | १९,९५ | २२,०९ | २५,३८ |
| प्रेफरन्स भागांवर | ३,१८ | ३,६४ | ३,६२ | ३,७१ | ३,६७ |
| डिफर्ड भागांवर | ६३ | ७९, | ६६ | ११ | ७ |
| १२ ताळेबंदाकडे वर्ग केलेला नफा | –७७ | ३,०० | –७,२१ | –१,९२ | –७७ |
| एकूण | ९७७,३८ | १२६४,७५ | १२२४,४९ | ११३१,५५ | १२०५,३९ |
| **उत्पन्न** | | | | | |
| १ मुख्य उद्योगाचें उत्पन्न | ८३५,०९ | १०८७,३८ | १०४६,२८ | ९६१,८४ | १०२६,२४ |
| २ इतर उत्पन्न | १८,२५ | २२,४८ | २१,५० | १९,४३ | १९,१९ |
| ३ अखेरचा शिलकी माल | १२४,०४ | १५४,८९ | १५६,७१ | १५०,२८ | १५९,९६ |
| एकूण | ९७७,३८ | १२६४,७५ | १२२४,४९ | ११३१,५५ | १२०५,३९ |

### नफा आणि मॅनेजिंग एजंटांचें वेतन
(आंकडे कोटी रुपयांचे)

| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मॅनेजिंग एजंटांचें वेतन | ९·८१ | १२·४२ | १०·४१ | १०·३६ | ११·१६ | ५४·१६ |
| कर | २५·०४ | ३३ ३० | २४·३९ | २७·१० | ३२·५१ | १४२·३४ |
| वाटलेला नफा | २३·६२ | २६·८९ | २४·२३ | २५·८९ | २९·१० | १२९·७३ |
| धंद्यांत राखलेला नफा | १४·७९ | २४·३२ | ६·६० | १२·७० | १६·६३ | ७५·०४ |
| एकूण | ७३·२६ | ९६·९३ | ६५·६३ | ७६·०५ | ८९·४० | ४०१·२७ |

## ऑर्डिनरी वसूल भांडवलावरील डिव्हिडंड

| उद्योगधंदा | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कपास गिरण्या | ८·३ | ९·४ | ७·४ | ८·१ | ८·२ | ८·३ |
| २. ताग गिरण्या | ११·० | १५·२ | ११·२ | ८·४ | ७·६ | १०·६ |
| ३. इतर टेक्स्टाइल्स | २·५ | ०·४ | १·५ | ३·९ | ४·४ | २·६ |
| ४. लोखंड व पोलाद | १२·९ | १४·२ | १६·९ | १२·६ | १२·६ | १३·५ |
| ५. इंजिनिअरिंग | २·८ | २·९ | २·९ | ३·५ | ४·३ | ३·३ |
| ६. सिमेंट | ७·१ | ८·६ | ८·६ | ९·० | ८·४ | ८·३ |
| ७. साखर | ८·३ | १०·१ | ९·९ | १०·९ | ११·४ | १०·२ |
| ८. कागद | ९·१ | १२·३ | १०·५ | १०·४ | १०·१ | १०·५ |
| ९. वनस्पति तेलें | २·५ | २·६ | २·७ | २·५ | २·२ | २·५ |
| १०. रसायनें | ३·० | २·५ | २·१ | २·२ | २·५ | २·५ |
| ११. आगपेट्या | १०·७ | १०·७ | १०·३ | १०·८ | १०·९ | १०·७ |
| १२. कोळसा | ७·८ | ७·१ | ७·४ | ६·० | ६·८ | ७·० |
| १३. वीज निर्मिति व पुरवठा | ४·६ | ७·२ | ६·९ | ६·३ | ७·२ | ६·५ |
| १४. शिपिंग | ०·८ | ३·९ | ५·२ | २·४ | १·९ | २·६ |
| १५. चहा | १८·६ | १२·० | ६·९ | १६·७ | ३४·१ | १७·९ |
| १६. इतर मळे | ११·६ | १४·९ | १२·८ | १५·८ | १७·३ | १४·६ |
| १७. व्यापार | ९·७ | ९·८ | ६·६ | ५·६ | ५·५ | ७·४ |
| १८. जमीन व मालमत्ता | १·३ | २·१ | १·६ | २·२ | १·९ | १·८ |
| एकूण (इतर धरून) | ७·५ | ८·१ | ७·१ | ७·५ | ८·३ | ७·८ |

## एकूण गुंतलेल्या भांडवलशाही ढोक नफ्याचें प्रमाण (%)

| उद्योगधंदा | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ कपास गिरण्या | ८·४ | ११·९ | ५·१ | ६·६ | ६·६ | ७·७ |
| २ ताग गिरण्या | ११·२ | १३·३ | ८·२ | ८·१ | ८·१ | १०·० |
| ३ इतर टेक्स्टाइल्स | ५·२ | २·८ | २·७ | ४·९ | ७·० | ४·६ |
| ४ लोखंड व पोलाद | १०·६ | १५·० | १४·५ | १३·९ | १५·३ | १४·० |
| ५ इंजिनिअरिंग | ६·५ | ६·७ | ६·४ | ५·६ | ७·१ | ६·५ |
| ६ सिमेंट | १०·९ | १३·७ | १३·० | ११·७ | १३·८ | १२·७ |
| ७ साखर | ८·० | १०·५ | ८·५ | ११·० | ९·१ | ९·४ |
| ८ कागद | ११·२ | १४·० | १२·८ | १२·५ | १०·० | १२·१ |
| ९ तेलें | २·७ | १·२ | १·२ | ४·२ | — | १·६ |
| १० रसायनें | ५·० | ५·५ | २·९ | ३·५ | ४·४ | ४·२ |
| ११ आगपेट्या | १७·२ | १६·२ | १६·२ | १३·६ | १३·१ | १५·१ |
| १२ कोळसा | ९·२ | ८·८ | ९·७ | ६·६ | ७·१ | ८·२ |
| १३ वीज उत्पादन व पुरवठा | ८·४ | ८·१ | ८·४ | ७·९ | ७·८ | ८·१ |
| १४ शिपिंग | २·५ | ८·२ | ७·४ | ३·५ | २·५ | ४·७ |
| १५ चहा | १८·४ | १०·७ | १·४ | २३·७ | ३३·७ | १८·९ |
| १६ इतर मळे | १४·७ | १७·५ | १३·३ | १४·८ | १६·५ | १५·४ |
| १७ व्यापार | ८·१ | ८·३ | ४·९ | ३·९ | २·९ | ५·७ |
| १८ जमीन व मालमत्ता | ३·८ | ४·७ | ४·० | ४·६ | ४·५ | ४·३ |
| एकूण (इतर धरून) | ९·० | १०·६ | ७·६ | ८·४ | ९·१ | ८·९ |

### हिंदी कपाशीची निर्गत

भारत सरकारनें १,५०,००० गांठी हिंदी कपाशीच्या निर्गतीस परवानगी दिली आहे. गेल्या डिसेंबरांत २,००,००० गांठी कपाशीच्या निर्गतीस परवानगी दिली होती. त्यापैकी बहुतेक गांठी चीन, जपान, हाँगकाँग, इत्यादि देशांकडे निर्गत करण्यांत आल्या.

### राष्ट्रभाषा-प्रचार-समिति, वर्धा

या संस्थेच्या राष्ट्रभाषा "कोविद" परीक्षेस भारत सरकारच्या रेल-पथ-मन्त्रालय-द्वारा तात्कालिक मान्यता लाभली आहे. घोषणेनुसार राष्ट्रभाषा-कोविद पास झालेल्या रेल-विभागीय ट्रेनिंग घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि प्रोबेशनरी अधिकाऱ्यांना आपल्या सेवा-स्थायित्वाकरितां वा पद-वृद्धिकरितां हिंदी योग्यता संबंधी विभागीय अन्य परीक्षा देण्याची आवश्यकता नाहीं, असें संचालक, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, पुणें कळवितात.

### श्री. दा. वा. पोतदार ह्यांचा सत्कार

श्री. दा. वा. पोतदार ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून फेर-नेमणूक झाली. त्यानिमित्त पूना बँकर्स असोसिएशननें त्यांचे सन्मानार्थ दि. ९ रोजीं रात्रीं पुणें येथें ड्रीमलँड हॉटेलांत भोजनसमारंभ घडवून आणला. त्या प्रसंगीं पुण्यांतील प्रमुख बँकर्स उपस्थित होते.

भोजनानंतर श्री. चिं. वि. जोग ह्यांनीं समयोचित भाषण केल्यावर श्री. व्ही. आर. सोनाळकर ह्यांनीं श्री. पोतदार ह्यांस पुष्पहार अर्पण केला. श्री. पोतदार ह्यांनीं आभाराचें भाषण केल्यानंतर श्री. वा. ग. अळतेकर ह्यांनीं आभार मानले. मेजवानीचे वेळीं व सत्कारानंतर श्री. बी. बी. पुरोहित ह्यांनीं छायाचित्रें घेतलीं

### बेळगांव बँकेची सर्वांगीण प्रगति

नफ्यांत मोठी वाढ : डिव्हिडंड ६¼% होणार.

| | ३१-१२-५५ | ३१-१२-५६ | वाढ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| ठेवी | १,०७,४५,००० | १,११,३८,००० | ३,९३,००० |
| खेळतें भांडवल | १,३४,८८,००० | १,४२,०१,००० | ७,१८,००० |
| डिव्हिडंड | ५% | ६¼% | १¼% |
| नफा | ५२,००० | ८०,००० | २८,००० |


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

**एकूण खेळतें भांडवल : रु. सव्वासात कोटींचे वर**

★ स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट योजना : व्याजाचा दर द. सा. द. शें. २.

★ रु. १०,००० व त्यावरील रकमा तीन महिने व अधिक मुदतीसाठी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरासाठी चौकशी करावी.

★ मराठवाडा व विदर्भांतील जनतेचे सोयीसाठी औरंगाबाद, जालना व नांदेड आणि अकोला येथेंहि बँकेच्या शाखा उघडण्यांत आल्या आहेत. त्याचा संबंधीं जनतेनें जरूर फायदा घ्यावा.

★ हेड ऑफिस, डे. जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी व पनवेल येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

★ लेटर्स ऑफ क्रेडिट उघडली जातात.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

### ब्रिटिश गिरणीमालकाचा कापडाच्या आयातीविरुद्ध प्रचार

मि. सायरिल लॉर्ड ह्या एका ब्रिटिश कापडगिरणीवाल्यानें गिरण्यांना सरकारची मदत मागण्यासाठी प्रचार चालविला आहे आणि त्याचा एक भाग म्हणून त्यानें ब्रिटिश पार्लमेंटच्या सर्व सभासदांकडे एक लहान ग्रामोफोनची तबकडी धाडली आहे. ह्या तबकडीवर तीन गिरणीकामगारांचे आवाज मुद्रित करण्यांत आले आहेत. "हाँगकाँग, भारत आणि जपान येथील गिरण्या लँकेशायरच्या गिरण्यांना मारून भरभराट पावत आहेत" अशा अर्थाचे ते शब्द आहेत. पूर्वेकडील देशांतून ग्रेटब्रिटनमध्यें स्वस्त कापडाची आयात होते, ती ब्रिटिश गिरणीवाल्यांना बंद पाडावयाची आहे.

### टेलिव्हिजनवर अर्भकाच्या जन्माचा देखावा

ग्रेटब्रिटनमध्यें टेलिव्हिजनवर अर्भकाचा प्रत्यक्ष जन्म घडतांना दाखविण्यांत आला. डॉक्टर्स व माता ह्यांच्यामधील चर्चेच्या संबंधांत हा जन्म दाखविला गेला. कार्यक्रमाच्या प्रारंभीं त्याबाबत सूचना देण्यांत आली होती आणि तरुणांनीं, लहान मुलांनीं व ज्यांना हा देखावा पहावयाचा नसेल त्यांनीं टेलिव्हिजनसेटपासून दूर जावें, असें सांगण्यांत आलें होतें.

### कापडाच्या तारणावरील कर्जें

कापडाच्या गिरण्यांतून कापडाचे साठे वाढत आहेत, कारण कापडाला सध्यां गिऱ्हाईक कमी आहे. गिरण्यांनीं विकलेल्या गाठीसुद्धां व्यापारी हलवीत नाहींत, अशी परिस्थिति आहे. अशा रीतीनें, सुमारें ७०० कोटी वार कापड पडून आहे. कापडाच्या तारणावरील कर्जांचे बाबतींत सोईस्कर तेवढें मार्जिन कमी करावें व अटी सौम्य कराव्या, अशी सूचना रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना केली आहे.

### भिकुसा कॉलेज ऑफ कॉमर्स

सिन्नर येथील एक व्यापारी, श्री. भिकुसा यमासा क्षत्रिय, ह्यांनीं गोखले एज्युकेशन सोसायटीला नाशिक येथें कॉमर्स कॉलेज स्थापन करण्यासाठीं १,५०,००० रुपयांची देणगी दिली आहे. कॉलेजचें नांव "भिकुसा यमासा कॉलेज ऑफ कॉमर्स" असें राहील.

### इंडोनेशियांतील बिकट आर्थिक परिस्थात

इंडोनेशियाच्या सरकारनें चलनाला आवश्यक असलेल्या सोन्याच्या व परराष्ट्रीय हुंडणावळीच्या आधाराचें किमान प्रमाण २०% चें १५% वर आणलें आहे. त्यामुळें, पेंचप्रसंग निर्माण झाला आहे आणि कागदी चलनांत बेसुमार वाढ करावी लागत आहे.


खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

सोनें व सोन्याचे दागिने यांच्या तारणावर माफक दरानं कर्जें दिलीं जातात.

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.



किर्लोस्कर लहान, मोठे लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमिनींच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या वनावटीचे योग्य असे लहान व मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे नांगरांची निवड करा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (सातारा)

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *
( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ — प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ )
मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ — कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०५०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

### रेल्वेचे मालवाहू डबे : उत्पादनांत वाढ होणार

रेल्वेला लागणारे मालवाहू डबे भारतांत ३५ वर्षांपूर्वीपासून तयार होत आहेत. आतां ह्या उत्पादनांत ८० टक्क्यांनीं वाढ करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. सध्यां मालडबे तयार करणाऱ्या कारखान्यांतून दरसाल २०,००० डबे तयार होऊं शकतात. आणखी १६,००० मालवाहू डबे तयार करण्याइतका कारखान्यांचा विस्तार करण्यांत येणार आहे. दरसाल ३६,००० डबे तयार होऊं लागले म्हणजे दोन पंचवार्षिक कार्यक्रमांच्या काळांत उत्पादनांत १० पट वाढ झाली असें होईल. १९५१-५२ सालीं, म्हणजे पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांत भारतांत अवघे ३,७०० मालडबे तयार करण्यांत आले होते. ह्या बाबतींत भारत आज आशिआंतील सर्व देशांच्या पुढें आहे. जपान पुढारलेला असला तरी ह्या बाबतींत तो भारताच्या मागेंच आहे. सध्यां कांहीं विशेष प्रकारचे मालवाहू डबे परदेशांतून आयात करावे लागतात. हे डबेहि भारतांत तयार करवून घेण्याचा रेल्वेबोर्डाचा विचार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत जितके डबे लागतील तितके कारखान्यांतून तयार होऊं शकतील. पण तिसऱ्या कार्यक्रमाच्या काळांत होणाऱ्या वाहतुकीच्या वाढीला तोंड देतां यावें म्हणून उत्पादन वाढविण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. सर्वसाधारण वाहतुकीसाठी जरूर असणारे मालडबे आतां परदेशांतून आयात करावे लागत नाहींत. उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत सहकार्य घेण्यासाठी १६ कारखान्यांची निवड करण्यांत आली आहे. ह्याशिवाय कांहीं नवे कारखानेहि काढण्यांत येणार आहेत. नवीन कारखाने दिल्ली, राजस्थान, उत्तरप्रदेश, सौराष्ट्र, मद्रास, इत्यादि राज्यांतून काढण्यांत येतील.

---

### शास्त्रीय शोध उद्योगधंद्यांच्या कारणीं लावा

अलीगड येथें 'नॅशनल ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस' ह्या संस्थेचें २६ वें अधिवेशन भरलें होतें. अधिवेशनाचें उद्घाटन करतांना युनिव्हर्सिटी ग्रॅन्टस कमिशनच अध्यक्ष, श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं शास्त्रीय शोध व औद्योगिक विकास ह्यासंबंधीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, देशाचा औद्योगिक विकास दृष्टीसमोर ठेवून शास्त्रीय संशोधन करण्याकडे अधिक लक्ष देणें अतिशय अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें, शास्त्रीय शोधांचा उपयोग औद्योगिक उत्पादनांत वाढ करण्यासाठी केला गेला पाहिजे. एखाद्या विशिष्ट उद्योगधंद्याची परिस्थिति निरोगी नसली तर त्याचीं कारणें शोधून काढण्याचें शिक्षण संशोधकांना दिलें गेलें पाहिजे. ह्या परिस्थितीवर उपाय काय करावे हेंहि त्यांना सांगतां आलें पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील भांडवलाची बहुतेक गुंतवणूक भारी व मूलभूत उद्योगधंद्यांत होणार आहे. शिक्षणाचा दर्जा आणि रोजगार मिळण्याचा साधा, ह्यांच्यांत निकटचे संबंध आहेत. देशांत नवीन पाटबंधारे, वीजकेंद्रें, इत्यादींची जरूरी लागेल. म्हणून शिक्षण हें केवळ तात्त्विक अगर पुस्तकी असतां कामा नय. लोकांच्या गरजांशीं तें निगडित असलें पाहिजे. मूलभूत शोध व व्यावहारिक उपयोगाचे शोध ह्यांच्यापैकी कशावर जोर द्यावा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय विद्यापीठांनीं आतांपर्यंत मूलभूत शास्त्रीय शोधांकडे अधिक लक्ष दिललें आह. ह्या दिशेनें त्यांनीं वाजवीपेक्षा अधिक वाटचाल केलेली आह. ह्यापुढें शास्त्रीय शोधांचा व्यावहारिक उपयोग करण्यासंबंधीं संशोधन करण्याकडे त्यांना अधिक लक्ष द्याव.

### आयातीस दिलेले परवाने

जुलै ते डिसेंबर, १९५६ ह्या सहामाहींत एकूण ४६१ कोटी रुपये किंमतीच्या मालाच्या आयातीसाठी १,३८,३६१ परवाने देण्यांत आले. १९५६ च्या पहिल्या सहामाहींत ५१७ कोटी रुपयांच्या मालाच्या आयातीस परवाने देण्यांत आले होते.

---

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस १९५६ मध्यें ९०.२ लक्ष रु. नफा झाला. भागदारांना १६% करमाफ डिव्हिडंड मिळेल. गेल्या वर्षीचा डिव्हिडंडचा दर १४% होता.

---

### ब्रिटिश बँक रेट उतरला

बँक ऑफ इंग्लंडचा बँक रेट ५½% होता तो आतां ५% करण्यांत आला आहे. फेब्रुवारी, १९५६ मध्यें बँक रेट ५½% केला गेला, १९३१ मध्यें तो ६% होता.

---

### रशिआंतील स्टॅंडर्ड टाइमच्या नव्या सरहद्दी

रशिआचा विस्तार प्रचंड असल्याकारणानें, घड्याळाच्या दृष्टीनें त्याचे ११ विभाग पाडण्यांत आलेले आहेत; त्या प्रत्येक विभागाची स्टॅंडर्ड टाइम वेगळी आहे. १९१९ मध्यें हे विभाग पाडले आणि ते पाडतांना रेल्वेचे मार्ग आणि नद्या ह्यांचाच विचार मुख्यतः करण्यांत आला होता. त्यानंतरच्या काळांत औद्योगिक प्रगति मोठ्या प्रमाणावर होऊन, घड्याळाच्या सरहद्दींच्या दोन्हीं बाजूंवर औद्योगिक क्षेत्रें पसरलीं आहेत. त्यामुळें, एकाच औद्योगिक क्षेत्रांत असणारांना वेगवेगळ्या वेळांतून व्यवहार करावे लागतात आणि त्यांत दोन तासांचाहि फरक पडूं शकतो. आतां, गेल्या मार्चपासून, नव्या सरहद्दी आंखण्यांत येतील.

---

**चुनखडीच्या दगडाच्या खाणी**—भारतीय सरकारच्या भूगर्भ संशोधन खात्यानें डेहराडून मसुरी विभागांत पाहणी केली. ह्या पाहणींत असें आढळून आलें आहे कीं, ह्या भागांत चुनखडीच्या खाणी विपुलतेनें सांपडूं शकतील. खाणींतून सुमारें ४० कोटी टन चुनखडीचा दगड निघूं शकेल असा अंदाज आहे. सिमेंटच्या उत्पादनासाठी दगडाचा उपयोग होतो.

**भिलई येथील कारखान्याची यंत्रसामुग्री**—भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची यंत्रसामुग्री रशिआंतील कारखान्यांतून तयार होऊं लागली आहे. यंत्रसामुग्रीचा दर्जा तपासून पहाण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक भारतीय इंजिनिअर रशिआंत पाठविला आहे. लेनिनग्रॅड येथील कारखान्याला त्यानें नुकतीच भेट दिली.

**लंडनमधील भारतीय प्रदर्शन**—लंडनमधील एका भव्य दुकानांत भारतांत तयार होणाऱ्या हस्तव्यवसायांतील वस्तूंचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. भारतीय कामगारांच्या हातांतील कसब लंडनमधील लोकांच्या नजरेसमोर आणण्याच्या दृष्टीनें प्रदर्शनाचा चांगला उपयोग झाला. प्रदर्शन अखिल भारतीय ग्रामोद्योग बोर्डानें भरविलें होतें.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : -श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## जुन्या मुंबई राज्यांतील गेल्या दोन वर्षांमधील विकास कार्याचा आढावा

### (१)

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पूर्वीच्या जुन्या मुंबई राज्यांत १४७·२१ कोटी रु. खर्च झाले. त्यांपैकीं ६६·४९ कोटी रु. योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत खर्च झाले. त्याशिवाय समाजविकास योजना, राष्ट्रीय विकास योजना, स्थानिक विकास कामें, लहान आणि शेतींचीं निमदुष्काळी पाटबंधाऱ्यांचीं कामें, औद्योगिक कामगारांसाठी घरें, कोयना धरणयोजना यासारख्या भारत सरकारनें पुरस्कृत केलेल्या राज्य योजनावर ४६·४३ कोटी रु. खर्च झाले. त्यांपैकी ७ कोटी रुपयांचा वांटा राज्य सरकारनें उचलला. एकूण ४६·४३ कोटी रु. पैकी २९·८० कोटी रु. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत खर्च झाले.

#### शेती

शेतीच्या बाबतींतहि मुंबई राज्य आघाडीवर आहे. अन्नधान्य उत्पादनामध्यें (अन्नपिकें आणि गळितांचीं पिकें) १९ टक्क्यांनीं वाढ झाली तर कापसाचें उत्पादन ६३ टक्क्यांनीं वाढलें. १९५०–५१ सालीं म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्यापूर्वी जुन्या मुंबई राज्यांत अन्नधान्याचें उत्पादन ४४,५७,००० टन होतें तें १९५५–५६ सालीं ८४,८०,०० टन इतकें झालें. तसेंच १९५०–५१ सालीं जुन्या मुंबई राज्यांत ४४२ लाख एकर क्षेत्र लागवडीखालीं होतें. त्यांत १९५५–५६ अखेर ३ लाख एकरांची भर पडली.

#### पाटबंधारे

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें २२·५७ कोटी रु. खर्चून सहा मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या योजना हातीं घेण्यांत आल्या. गेल्या दोन वर्षांत त्यांच्यावर ८·९८ कोटी रु. खच करण्यांत आलें असून त्यांची प्रगति समाधानकारक रीतीनें चालू आहे. त्याप्रमाणें काकडापार, वीर आणि कनाळ प्रोजेक्ट मही राईट बँक कॅनॉल पहिला भाग, घटप्रभा लेफ्ट बँक कॅनॉल प्रोजेक्ट, गंगापूर धरणयोजना, राणंद तलाव आणि कोल्ची बंधारा या योजना पूर्ण झाल्यावर मुंबई राज्याच्या सहा जिल्ह्यांतील (म्हैसूर राज्यांत गेलेले दोन जिल्हे वगळून) १२७१२०० एकर जमिनीला पाणी मिळूं लागेल. यांपैकी कांहीं योजनापासून पाणी पुरवठा सुरूहि झाला आहे.

#### छोटे पाटबंधारे

निरनिराळ्या निमदुष्काळी कार्यक्रमाखाली आणि अधिक धान्य पिकवा मोहिमेखाली छोट्या आणि मध्यम स्वरूपाच्या १३१४ पाटबंधारे योजना मंजूर करण्यांत आल्या होत्या. त्या पैकीं मार्च १९५४ पर्यंत १२५६ योजना पूर्ण होऊन १४६०१० एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊं लागला. नंतर छोट्या आणि मध्यम पाटबंधाऱ्यांच्या योजनेंत वाढ करण्यांत येऊन त्यांची एकूण संख्या २३०६ इतकी करण्यांत आली. त्याला अंदाजें १७·१३ कोटी रु. खर्च येईल. त्यांपैकी मार्च १९५६ पर्यंत १६७६ योजना पूर्ण होऊन २१४००० एकर क्षेत्र पाण्याखाली आलें.

नव्या विहिरी बांधण्यासाठी आणि जुन्या दुरुस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना तगाई कर्जें देण्यांत आलीं. मार्च १९५६ पर्यंत १४०००० एकर जमीन विहिरींच्या पाण्याखाली भिजूं लागली. त्याशिवाय ३२९ सहकारी लिफ्ट इरिगेशन सोसायट्यांमार्फत ९१०१४ एकर जमिनीस पाणी मिळूं लागलें.

१९५५–५६ अखेर ४२७४१२६ एकर क्षेत्रांत पिकांच्या सुधारलेल्या जातीच्या बियाण्यांचा वापर करण्यांत आला. निमदुष्काळी भागांतील जमीन सुधारणेच्या योजनेखाली १३१८००० एकर जमिनींस बंदिस्ती करण्यांत आली. त्याशिवाय ३३९ नलिका विहिरी खोदण्यांत आल्या. ५६६१६ एकर पडीक जमीन लागवडीयोग्य करण्यांत आली. आणि १४९३९ एकर क्षेत्रांत यांत्रिक पद्धतीनें शेती करण्यांत चार वर्षांचा पदवी-परीक्षेचा अभ्यासक्रम नेमण्यांत आला असून तेथें अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सोय करण्यांत शेतकी शाळाहि चालू आहेत.

जपानी पद्धतीची भात शेती शेतकऱ्यांत लोकप्रिय होत असून १९५५–५६ अखेर १७५००० एकर क्षेत्रांत या पद्धतीनें भातशेती करण्यांत आली.

१९५५ च्या मुंबई कूळ वहिवाट आणि शेतजमिनीसंबंधीच्या (दुरुस्त) कायद्यांचा उल्लेखहि केला पाहिजे. या कायद्यानुसार १ एप्रिल १९५७ पासून जमिनीच्या समान वांटणीचें तत्त्व अंमलांत येऊन कुळें जमिनीचे मालक बनतील. "कसेल त्याची जमीन" या ध्येयाच्या दिशेनें टाकलेलें हें पुढचें पाऊल आहे असें म्हणतां येईल. पहिलें पाऊल म्हणजे तुकडेजोड कायदा. १४६० खेड्यांतील २१·१९ लाख एकर जमिनीच्या बाबतींत हा कायदा लागू करण्यांत आला आहे.

#### वीज

विजेची वाढती मागणी भागविण्याकरितां पहिल्या पंचवार्षिक योजनेखाली १०·४९ कोटी रु. खर्चून सात वीजयोजना सुरू करण्यांत आल्या. १९५५–५६ सालीं दक्षिण गुजरात इलेक्ट्रिक ग्रिड योजनेपासून ७५०० किलोवॅट वीज मिळूं लागली. कोयना वीजयोजनेच्या पहिल्या भागाच्या कामाला जानेवारी १९५४ पासून सुरुवात झाली. टाटा कंपनीला तुर्भे येथें १ लाख किलोवॅटचीं २ थर्मल स्टेशनें उभारण्यास परवानगी देण्यांत आली होती. त्यांपैकी ५०००० किलोवॅटचें एक स्टेशन सुरू झाल्यानें विजेची तूट बऱ्याच प्रमाणांत भरून येऊं शकली. आणि मुंबईच्या कापड गिरण्यांतून चालू असलेली पाळ्यांची पद्धत सरकारला बंद करणें शक्य झालें.

#### गुरांची निगा

पंचवार्षिक योजनेखाली पशुसंवर्धनाच्या अनेक योजना हातीं घेण्यांत आल्या. मुंबई राज्यांत सध्यां १७० गुरांचे दवाखाने आहेत.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.